# पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६
दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२
ई-मेल :panvelcorporation@gmail.com वेबसाईट:www.panvelcorporation.com

दि. ०३ /०६/२०२४

## निवड उमेदवारांकरीता सूचना

पनवेल महानगरपालिका सरळसेवा पदभरती २०२३ अंतर्गत माहे डिसेंबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रम, प्रवर्गनिहाय, सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवड सूचीतील निवड यादीत नमूद असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात सादर केलेली माहिती व दस्ताऐवजाची पडताळणी करण्यात आली आहे.

दस्ताऐवज पडताळणीअंती पात्र उमेदवारांना निवड पत्र देण्यात आले असून वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेबाबत पत्र देण्यात आले आहे. वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दि.१५/०३/२०२३ रोजी वा त्यापुर्वी सादर करणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसहिंता दि.१६/०३/२०२४ रोजी पासुन लागु झाली असल्याने नियुक्ती आदेश दिलेल्या तथापी सेवेत रुजू न झालेल्या उमेदवारांना सेवेत रुजू करुन घेता आले नाही. तसेच नव्याने वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र व पुर्व चारित्र्य पडताळणीप्रमाणपत्र सादर केलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देता आले नाहीत.

भारत निर्वाचन आयोग नवी दिल्ली यांचे कडील प्रेस नोट क्र.ECI/PN/१००/२०२४, दि.२४/०५/२०२४ अन्वये विधानपरिषद कोकण पदवीधर मतदार संघाचा निवडणुक कार्यक्रम जाहिर झाला असुन त्यानुसार अधिसुचना दि.३१/०५/२०२४ रोजी प्रसिध्द होऊन निवडणुक दि.२६/०६/२०२४ रोजी होणार असुन मतमोजणी दि.०१/०७/२०२४ रोजी होणार आहे. व निवडणुकीची संपुर्ण प्रक्रिया दि.०५/०७/२०२४ रोजी पर्यंत पुर्ण करावयाची आहे. सदर प्रेसनोट नुसार या निवडणुकीची आदर्श आचारसंहिता दि.२४/०५/२०२४ रोजी पासुन दि.०५/०७/२०२४ पर्यंत लागु आहे.

सबब, यापुर्वी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या उमेदवारांकरीता सेवेत रुजू होण्याचा अंतिम दिनांक १५/०६/२०२४ ऐवजी ३१/०७/२०२४ व आदर्श आचारसहिंता संपुष्टात आल्यावर नियुक्ती आदेश देण्यात येणाऱ्या उमेदवारांना सेवेत रुजु होण्याचा अंतिम दिनांक नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून ३० दिवस असा निश्चित करण्यात येत आहे.

सेवेत रुजू होण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.२१/०६/२०२१ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ मधील तरतूदीनुसार सेवा ज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

**तरी सर्व निवड उमेदवारांना सुचित करण्यात येते की, सेवेत रुजू होण्याच्या अंतिम दिनांकाची नोंद घ्यावी.**

(डॉ. प्रशांत रसाळ)
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका